INDIAN EDUCATION SOCIETY
# MODERN ENGLISH SCHOOL
SCHOOL INDEX NO. 3105026
D. S. Babrekar Marg, Dadar, Mumbai - 400 028.
Regd. U/No. SSN- 1184/10549/45-N SEI dt. 16-5-1985 & GRI/New School 1957, 1958 dt. 4-6-1985
E-mail : modern.secondary.english@ies.edu Phone : 2446 7170 E-mail : iesmodern@gmail.com

Ref. No. IES/MES/276/2021-22 Date 30.9.2021

Dear Parents/ Guardian,

Sub: Re-opening of schooling from 04/10/2021, physically and release of consent to Send your child to physical school.

1. Government of Maharashtra Circular dated 7th July, 2021
2. Government of Maharashtra Circular dated 10th August, 2021
3. Government of Maharashtra Circular dated 24th September, 2021
4. Brihanmumbai Mahanagarpalika Circular dated 29th September, 2021

1. As you are aware, the Government of India and the Government of Maharashtra had directed schools to be closed during the lockdown period imposed due to the COVID-19 pandemic.

2. The two Governments have been lifting the lockdown in a phased manner and have permitted the re-opening of physical schooling, subject to certain terms and conditions. These terms and conditions (Standard Operating Procedures – SOPs) have been set out by the Government of India (Ministry of Education) and the Government of Maharashtra (including School Education and Sports Department). These terms and conditions are available on the website of the respective ministries.

3. You are requested to read the SOPs of the respective Governments and take an informed decision and give informed consent or refusal as to whether you will be sending your child to the school physically.

4. In case any student is found not following the protocol, the School will not permit the student to attend school. Parents are expected to train their respective wards on all safety protocols such as wearing mask / social distancing / hand and other hygiene etc. while in School as well as while travelling to and from School.

5. Parents are also requested to confirm that in case their ward has come / comes in contact with COVID-19 patient, the parents will not send their ward to School, under intimation to the School. The parents will send their ward to School only after she / he is declared medically fit to attend after conducting necessary medical tests to confirm that their ward is COVID Negative

6. School reserves the right to not permit a student to attend School in case the School finds that the student is not following protocol / rules / discipline, and the decision of the School will be final and binding in this matter.

7. School / Management shall not be held responsible in case any illness is contracted by any student during this period of Schooling.

8. Parents / Guardians are requested not to visit the School during this period.

9. Parents / Guardians are requested to provide their ward with a spare mask / small hand sanitizer bottle as part of their daily routine. Parents are requested to train their wards not to share any item with fellow students during this period.

10. The format of consent is annexed hereto. Parents giving consent to send their ward to School may tick the "YES" box. Parents who do not wish to send their ward to School presently may tick the "No" box .

11. You are requested to fill in the same and return it to the school, at your earliest and in any case, to enable the school to take informed decisions for implementation of start of physical schooling.

Headmistress
I.E.S. MODERN ENGLISH SCHOOL
D. S. BABREKAR MARG,
DADAR (W), MUMBAI-400 028.

INDIAN EDUCATION SOCIETY

# MODERN ENGLISH SCHOOL

SCHOOL INDEX NO. 3105026

D. S. Babrekar Marg, Dadar, Mumbai - 400 028.

Regd. U/No. SSN- 1184/10549/45-N SEI dt. 16-5-1985 & GRI/New School 1957, 1958 dt. 4-6-1985

E-mail : modern.secondary.english@ies.edu Phone : 2446 7170 E-mail : iesmodern@gmail.com

Ref. No IES/MES/277/2021-22 Date 30.9.2021

विषय - विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने दिनांक ०४/१०/२०२१ पासून, शालेय शिक्षण पुन्हा सुरू करणे आणि आपल्या पाल्यास प्रत्यक्ष शाळेत पाठविण्यासाठी लेखी संमती कळविणे बाबत.

१. महाराष्ट्र शासन परिपत्रक दि. ०७ जुलै, २०२१
२. महाराष्ट्र शासन परिपत्रक दि. १० ऑगस्ट, २०२१
३. महाराष्ट्र शासन परिपत्रक दि. २४ सप्टेंबर, २०२१
४. बृहन्मुंबई महानगरपालिका परिपत्रक दि. २९ सप्टेंबर, २०२१

१. आपणास ठाऊकच आहे की भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने कोव्हीड -१९ या साथीच्या आजारामुळे लागू केलेल्या लॉकडाऊन कालावधीत शाळा बंद ठेवण्याचे निर्देश दिले होते.

२. दोन्ही सरकारे टप्प्याटप्प्याने लॉकडाउन शिथिल करीत आहेत आणि काही अटी व शर्तींच्या आधारे प्रत्यक्ष उपस्थितीने शिक्षण पुन्हा सुरू करण्याची परवानगी त्यांनी दिली आहे. या अटी व शर्ती (मानक कार्यप्रणाली - एसओपी) भारत सरकार (शिक्षण मंत्रालय) आणि महाराष्ट्र सरकार (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांनी तयार केल्या आहेत. या अटी व शर्ती संबंधित मंत्रालयांच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

३.आपणास संबंधित सरकारच्या एसओपी कार्यपद्धती वाचण्याची आणि निर्णयांची माहिती घेण्याची विनंती केली आहे आणि त्यानुसार आपण आपल्या पाल्यास प्रत्यक्ष शाळेत पाठविणार आहात की नाही याबद्दल संमतीपत्र देवून लेखी कळवावे.

४. विद्यार्थी प्रोटोकॉलचे/सूचनांचे पालन करीत नसल्याचे आढळल्यास, शाळा विद्यार्थ्याला शाळेत येण्याची परवानगी देणार नाही. पालकांनी त्यांच्या पाल्यांना शाळेत येता जाताना मास्क / सामाजिक अंतर / हाताची आणि इतर स्वच्छता इत्यादी सर्व सुरक्षा विषयक सूचनांचे प्रशिक्षण दयावे अशी अपेक्षा आहे.

५. पालकांनी त्यांचा पाल्य जर कॉव्हीड -१९ रूग्णाच्या संपर्कात आला असेल किंवा आजारी असेल तर पालकांनी आपल्या पाल्याला शाळेत पाठवू नये व तसे शाळेत कळवावे. पालकांनी आपला पाल्य शाळेत पाठविताना पाल्य कोव्हिड नकारात्मक आहे याची तपासणी करूनआवश्यक त्या वैद्यकीय चाचण्या घेतल्यानंतर वैद्यकीयदृष्ट्या उपस्थित राहण्यास वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त झाल्यानंतरच शाळेत पाठवावे.

६. विद्यार्थी जर शाळेत सूचना / नियम / शिस्त पाळत नसल्याचे आढळल्यास विद्यार्थ्याला शाळेत न घेण्याचा हक्क शाळेने राखून ठेवलेला आहे आणि या निर्णयाबद्दल शाळेचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

७. या शैक्षणिक वर्षात कोणताही विद्यार्थी आजारी झाल्यास शाळा / व्यवस्थापनास जबाबदार धरले जाणार नाही.

८. कृपया पालकांनी या कालावधीत शाळेत भेटण्यास येवू नये ही विनंती.

९. पालकांना विनंती आहे की त्यांच्या पाल्याला त्यांच्या दैनंदिन कामकाजाच्या साहित्यामध्ये अधिकचा मास्क, हतरुमाल, स्वच्छ पाण्याची बाटली विद्यार्थ्यांबरोबर द्यावी. या काळात सहकारी विद्यार्थ्यांकडून कोणतीही वस्तू सामायिकपणे न वापरण्याची पाल्याला प्रशिक्षित करण्याची विनंती पालकांना करण्यात येत आहे.

१०. संमती पत्राचा नमुना सोबत जोडला आहे. शाळेत आपला पाल्य पाठविण्यास संमतीपत्र देणारे पालक "होय" समोर बॉक्समध्ये टिक करू शकतात. ज्या पालकांना आपल्या पाल्यास प्रभाग सध्या शाळेत पाठवायचा नाही, ते "नाही" समोर बॉक्समध्ये टिक करू शकतात.

११. आपणास विनंती आहे की संमती पत्र लवकरात लवकर भरून कोणत्याही परिस्थितित शाळेत जमा करावे म्हणजे प्रत्यक्ष उपस्थितीने शाळा सुरु करण्यासंबंधी निर्णय घेता येईल.

Headmistress
I.E.S. MODERN ENGLISH SCHOOL
D. S. BABREKAR MARG,
DADAR (W). MUMBAI-400 028.

# बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग

शिक्षणधिकारी यांचे मुख्य कार्यालय त्रिवेणी संगम मनपा शालेय इमारत,

त्रिवेणी सदनच्या मागे

क्र. ईओजी/ 1727, दि. 29.09.2021

## परिपत्रक

प्रति,

सर्व मुध्याध्यापाक, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमाच्या महापालिका प्राथमिक व माध्यमिक आणि सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या खाजगी अनुदानीत व विनाअनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळा,

विषयः बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये इयत्ता 8 वी ते 12 वी चे वर्ग सुरक्षितपणे सुरु करण्याबाबत.

संदर्भः
1. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दि. 15 जून, 2020 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2020 / प्र. क्र. 86 / एसडी-6.
2. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनांक 10 नोव्हेंबर 2020 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2020 / प्र. क्र. 140 / एसडी-6
3. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनांक 07 जूलै 2021 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2021/ प्र. क्र. 94 / एसडी-6.
4. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनांक 10 ऑगस्ट 2021 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2021 / प्र. क्र. 113 / एसडी-6.
5. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनांक 24 सप्टेंबर 2021 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2021 / प्र. क्र.113 / एसडी-6.
6. मा.आयुक्तांचा मंजुरी क्र.एमजीसी/एफ / 5286 दि. 29.09.2021.

उपरोक्त संदर्भित विषयान्वये, राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनाने राज्यामध्ये लॉकडाऊनचा निर्णय घेतलेला होता. सदरचा निर्णय प्रथमतः दि. 31 मार्च, 2020 पर्यंत लागू करण्यात आला होता. लॉकडाऊनचा एक भाग म्हणून राज्य शासनाने राज्यातील सर्व शासकीय/खाजगी व्यवस्थानाच्या अनुदानित विना अनुदानित / स्वयं अर्थसहाय्यीत शाळा / कनिष्ठ महविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. तद्नुषंगाने, संदर्भ क्र. 1 ते 8 च्या शासन परिपत्रकांन्वये निर्देशिल्याप्रमाणे वेळोवेळी कोव्हीड-19 चा प्रादुर्भावाची तिव्रता लक्षात घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नगरबाहय विभागाच्या सर्व शाळा वेळोवेळी मान. आयुक्तांच्या मंजुरी अन्वये विद्यार्थ्यांसाठी आजमितीपर्यंत बंद ठेवण्यात आल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. 5 च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता 5 वी ते 12 वी व शहरी भागातील इयत्ता 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग दि 4 ऑक्टोबर 2021 पासून सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने, बृहन्मुंबई क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळांमधील इयत्ता 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग संदर्भित शासन निर्णय क्र. 1 ते 5 मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन सुरु करण्यास मान. आयुक्तांची उपरोक्त संदर्भ क्र. 6 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. यास्तव, या परिपत्रकान्वये संदर्भित शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचना सोबतच खालीलप्रमाणे अन्य सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

1. कोव्हीड 19 बाबत संदर्भित शासन निर्णय क्र. 1 ते 5 मधील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन बृहन्मुंबई क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळांमधील इयत्ता 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग दि. 04 ऑक्टोबर 2021 पासून सुरु करावेत.
2. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळांमधील इयत्ता 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग सुरु करण्यास आवश्यकतेनुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना उपस्थित ठेवावे.
3. शाळा सुरु करण्यापूर्वी व शाळा सुरु झाल्यानंतर आरोग्य, स्वच्छता व इतर सुरक्षा विषयक उपाययोजनांबाबतच्या मार्गदर्शक सूचना सोबत जोडण्यात आलेल्या ( परिशिष्ट अ व ब ) नुसार कार्यवाही करण्यात यावी.
4. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांचे सहाय्यक आयुक्त यांच्या सहाय्याने सोडीयम हायपोक्लोराईड सोल्युशनने निर्जतुंकीकरण करुन घेण्यात यावे तसेच, इतर व्यवस्थापनांच्या शाळांनी आपल्या स्तरावर वर्गांचे निर्जतुंकीकरण करुन घ्यावे.
5. बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये इ. 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग असलेल्या शाळांमधील कोव्हीड लसीकरण केंद्र व कोव्हीड विलगीकरण कक्ष सहाय्यक आयुक्त यांच्या सहाय्याने अन्य ठिकाणी स्थलांतरीत करुन वापरण्यायोग्य सुस्थितीत करावे.
6. कोव्हीड सेंटर , रेल्वे स्टेशनवर कोव्डीड लसीकरण प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी तसेच, निवडणुक विषयक कामासाठी नेमण्यात आलेल्या शिक्षक कर्मचा-यांना कार्यमुक्त करुन घ्यावे.
7. बृहन्मुंबई महानगरपालिका अधिपत्याखालील शाळांनी आपल्या शाळांमधील इ. 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग असलेल्या शाळा नजीकच्या महानगरपालिकेच्या किंवा खाजगी आरोग्य केंद्राशी संलग्न कराव्यात.
8. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अन्य व्यवस्थापनाच्या शाळांनी आपल्या शाळांमधील इ. 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग असलेल्या शाळा नजीकच्या महानगरपालिकेच्या किंवा खाजगी आरोग्य केंद्राशी संलग्न कराव्यात.

सर्व शाळांनी इ. 8 वी ते 12 वी पर्यंतचे वर्ग सुरु करण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य शासनाच्या संदर्भ क्र. 1 ते 5 मधील परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार तयारी झाल्याबाबतची खातरजमा करावी. आणि उपरोक्त अनु. क्र.1 ते 8 येथील सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी व त्याचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

सोबत : संदर्भित शासन निर्णय व 'परिशिष्टांची प्रत जोडण्यात आलेली आहे.

राजू तडवी
शिक्षणाधिकारी (प्र.)

प्रत माहिती व कार्यवाहीकरीता,
उपप्रमुख लेखापाल (शिक्षणनिधी)
शिक्षण निरीक्षक, (बृहन्मुंबई पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग)
उपशिक्षणाधिकारी (खाजगी / माध्यमिक / प्राथमिक / शहर / पूर्व व पश्चिम उपनगरे)
सर्व प्रशासकीय अधिकारी (शाळा) / अधीक्षक (शाळा) विभाग निरीक्षक (शाळा)
प्रत माहितीकरीता सविनय सादर-
मान. महापालिका आयुक्त
मान. अतिरिक्त आयुक्त (पू.उपनगरे)
मान. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मान. सह. आयुक्त (शिक्षण)
मान. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे.
मान. शिक्षण उपासंचालक, मुंबई विभाग.

राजू तडवी
शिक्षणाधिकारी (प्र.)

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वी व शहरी भागातील इयत्ता ८ वी ते १२ च्या शाळांचे वर्ग सुरक्षितपणे सुरु करण्यासाठी अतिरिक्त मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण : २०२१/प्र.क्र.११३/एसडी-६

मादम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

दिनांक : -२४ सप्टेंबर, २०२१

वाचा :-१) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दिनांक १५ जून, २०२०.

२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दिनांक २४ जून, २०२०.

३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दिनांक २२ जुलै, २०२०.

४) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दिनांक १७ ऑगस्ट, २०२०.

५) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२०.

६) संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.जाक्र अमाशा /शा.सुरु/२०२१/एस-१/१८७२, दि.१४ जून, २०२१.

७) मा.मुख्यमंत्री यांचेकडील बैठक दिनांक २२/०६/२०२१

८) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण : २०२१/प्र.क्र.९४/एसडी-६, दि.७ जुलै, २०२१

९) सार्वजनिक आरोग्य विभागाचे Break the Chain-Modified Guidelines आदेश, दि.२ ऑगस्ट,२०२१

१०) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.११३/एसडी-६, दिनांक १० ऑगस्ट, २०२१

**पार्श्वभूमी :-**

उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र. ८ व १० येथील परिपत्रकान्वये राज्यातील शाळांमधील वर्ग सुरु करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. मा.मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील कोविड परिस्थितीचा आढावा घेऊन लॉकडाऊनच्या अनुषंगाने शिफारशी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत टास्क फोर्स नियुक्त करण्यात आलेला आहे. सदर टास्क फोर्ससोबत दि.२४.८.२०२१ रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी टास्क फोर्सने शाळा सुरु करण्यासंदर्भात काही शिफारशी / सूचना केल्या आहेत. सदर सूचनांपैकी ज्या सूचना उपरोक्त अ.क्र. ८ व १० येथील परिपत्रकान्वये विभागाने दिलेल्या नाहीत अशा अतिरिक्त मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक :**

२. शासन परिपत्रक दिनांक ७ जूलै, २०२१ व दिनांक १० ऑगस्ट,२०२१ नुसार देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांसह सदर परिपत्रकात नमूद अतिरिक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन करून राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वी व शहरी भागातील इयत्ता८वी ते १२ वी चे वर्ग दि. ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून सुरू करण्यास सदर परिपत्रकान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. **अतिरिक्त मार्गदर्शक सूचना :-**

**अ) प्रत्येक शाळेमध्ये हेल्थ क्लिनिक सुरु करणे :-**

- शक्य असल्यास क्लिनिक सुरु करावे.
- विद्यार्थ्यांचे नियमितपणे टेम्परेचर तपासावे.
- शक्य असल्यास यासाठी इच्छूक डॉक्टर पालकांची मदत घेण्यात यावी.
- सर्व शाळा आरोग्य केंद्राशी संलग्न कराव्यात.
- हेल्थ क्लिनिकमध्ये स्थानिक आरोग्य केंद्रामधील डॉक्टर व परीचारीकांची मदत घ्यावी.
- उपरोक्त कामासाठी CSR किंवा स्थानिक निधीतून खर्च करण्यात यावा.

**ब) शाळेत येताना घ्यावयाची काळजी :-**

- मुलांना शाळेत पायी येण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहित करावे.
- ज्या शाळांमध्ये स्कूलबस / खाजगी वाहनाद्वारे विद्यार्थी येतात, अशा वाहनांमध्ये एका सिटवर एकच विद्यार्थी बसून प्रवास करेल याची दक्षता घेण्यात यावी.
- विद्यार्थी बसमध्ये चढताना व उतरताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी वाहन चालक / वाहक यांनी विद्यार्थ्यांना सॅनिटायझरचा वापर करण्यास प्रोत्साहित करावे.

**क) शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी नवीन मार्गदर्शक सूचना:-**

- जेवण व इतर बाबी केल्यानंतर साबण किंवा सॅनिटायझरने हात धुण्याबाबत विद्यार्थ्यांना सतत सूचना दयाव्यात.
- विद्यार्थ्यांनी गृहपाठ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत निर्देश दयावेत, जेणेकरुन विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांची अदलाबदल होणार नाही.
- वेळ असल्यास गृहपाठ शक्यतो वर्गांमध्येच करुन घ्यावा.

**ड) खेळाच्या मैदानाबाबत मार्गदर्शन:-**

- सद्य:स्थितीत कोणत्याही प्रकारचे खेळ घेण्यात येवू नयेत.
- कोरोना विषयक परिस्थिती सर्वसामान्य झाल्यानंतर काही खेळ घेण्यास हरकत नाही. तथापि असे खेळ घेत असताना खालीलप्रमाणे काळजी घेण्यात यावी.
- खेळाचे साहित्य नियमित सॅनिटाईज करावे.
- खेळ खेळणाऱ्या विद्यार्थ्यांकडे शिक्षकांनी लक्ष दयावे, विशेषत: थकलेल्या व दमलेल्या विद्यार्थ्यांकडे लक्ष असावे.
- विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मास्क असावा व त्यांच्यामध्ये २ मीटरचे अंतर असावे.
- जवळचे संबंध येणारे खेळ जसे, खो-खो, कबड्डी इत्यादी टाळावे. क्रिकेट, शारीरिक शिक्षण अशाप्रकारचे खेळ/ कार्य करण्यास हरकत नाही.

**इ) आजारी विद्यार्थी शोधणे :-**

- ताप, सर्दी, जोरात श्वासोच्छवास करणारे, शरीरावर ओरखडे, डोळे लाल झालेले, ओठ फुटलेले व लाल झालेले, बोटे, हात आणि सांधे सुजलेले, उलटया - जुलाब व पोटदुखी असलेले विद्यार्थी वर्गात असल्याचे लक्षत आल्यानंतर त्यांना डॉक्टरकडे नेण्याची व्यवस्था करावी व डॉक्टरांच्या सल्ल्याने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत निर्णय घ्यावे.

**फ) विद्यार्थ्यांवरील मनोसामाजिक परिणामांबाबत शिक्षकांना अवगत करणे- खालील लक्षणे दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांची शिक्षकांनी विशेष काळजी घ्यावी.**

- जास्त चिडचिड करणारे, रागीट व छोटयाशा गोष्टीने निराश होणारे,

- वर्गात नेहमी शांत बसणारे व कोणत्याही गोष्टीत स्वारस्य न दाखविणारे,
- वयाशी विसंगत वर्तणूक दर्शविणारे उदा. अंगठा चोखणे इ.,
- खाण्याच्या व झोपण्याच्या सवयीत बदल दर्शविणारे,
- शालेय शिक्षणात असामान्य घट दर्शविणारे,
- असहाय्य झालेले व सतत रडणारे विद्यार्थी.
- अशी लक्षणे असणाऱ्या विद्यार्थ्यांची विशेष काळजी घ्यावी व त्याच्याशी संवाद साधावा.

ग) **<u>विद्यार्थ्यांच्या मनोसामाजिक स्वास्थ्याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन :-</u>**

- पहिल्या १ ते २ आठवडयामध्ये थेट शिक्षणावर भर न देता विद्यार्थ्यांस शाळेची सवय होवू दयावी.
- प्रत्येक विद्यार्थ्याची पार्श्वभूमी अवगत करुन त्यानुसार विद्यार्थ्यांशी परस्पर संवाद साधावा.
- कोविड होवून गेलेल्या विद्यार्थ्यांशी सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे वागावे,
- विद्यार्थी व पालकांशी ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने संपर्कात राहणे.

ह) **<u>शिक्षक-पालक बैठकीत चर्चा :-</u>**

- कोविड आजाराबाबत माहिती व सदर आजार टाळण्याबाबत माहिती देणे,
- पालकांच्या प्रश्नांना योग्य संवादाने उत्तर दयावे,
- पालकांनी पुरेसे मास्क तयार करणे व सदर मास्क दररोज धुणे,
- मुलांना मोबाईलची सवय लागू नये अशा पध्दतीने पालकांनी लक्ष ठेवण्याबाबत पालकांना मार्गदर्शन करणे.
- लवकर उठून शाळेच्या वेळेत मुलांना तयार करणे,
- मुलांना कमीत कमी पुस्तके /वहया न्याव्या लागतील अशी व्यवस्था असावी.

ज) **<u>घरात प्रवेश करताना घ्यावयाची काळजी :-</u>**

- घरात आल्यानंतर थेट स्नानगृहामध्ये जाणे,
- स्नान करुन युनिफॉर्म बदलणे,

- आंघोळीनंतर युनिफॉर्म साबणाच्या पाण्यात बुडवून ठेवावा किंवा संबंधित शाळेने विद्यार्थ्यांना युनिफॉर्म ऐच्छिक करावा.
- मास्कसुध्दा साबणाच्या पाण्याने धुवून बाहेर वाळत ठेवावा,
- पालकांनी मुलांना शाळेचे उपक्रमाबाबत अवगत करुन त्यांना पुढील दिवसासाठी तयार करावे.

**ल) सीएसआर निधीचा उपयोग करणेबाबत :-**

- शाळांना फॅन, सॅनिटायझर या गोष्टी सीएसआर निधीमधून उपलब्ध करुन घेण्यास हरकत नसावी,
- वैद्यकीय उपकरणे जसे, ऑक्सीमीटर, इन्फ्रारेड थर्मामीटर, औषधे, मास्क इ. सीएसआर मधून उपलब्ध करुन घेण्यास हरकत नसावी.

४. वरील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच शासनाने कोविड संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन देखिल करण्यात यावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०९२४१७५९०२८९२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( राजेंद्र पवार )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४) मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
५) मा. सभापती व मा. उपसभापती, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
६) मा. मंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
८) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
११) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) प्रभारी संचालक, बालभारती,
१४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१५) मुख्य  कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१६)  मुख्याधिकारी, नगरपालिका, सर्व
१७)शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक (सर्व)
१८) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).
१९) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
२०) निवडनस्ती (कार्या.एसडी-६)

------------

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्यातील शहरी भागात ८वी ते १२ वी व ग्रामीण भागातील ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरक्षितपणे सुरु करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण : २०२१/प्र.क्र.११३/एसडी-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : -१० ऑगस्ट, २०२१

वाचा :- १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १५ जून, २०२०.
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २४ जून, २०२०.
३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २२ जुलै, २०२०.
४) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १७ ऑगस्ट, २०२०.
५) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २९ ऑक्टोबर, २०२०.
६) संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.जाक्र अमाशा /शा.सुरु/२०२१/एस-१/१८७२, दि.१४ जून, २०२१.
७) मा.मुख्यमंत्री यांचेकडील बैठक दिनांक २२/०६/२०२१
८) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण : २०२१/प्र.क्र.९४/एसडी-६ दि.७ जुलै, २०२१
९) सार्वजनिक आरोग्य विभागाचे Break the Chain-Modified Guidelines आदेश दि.२ ऑगस्ट,२०२१

**पार्श्वभूमी :-**

सन २०२० या वर्षात राज्यामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु झाला. त्यानंतर शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे राज्यातील कोरोनाची परिस्थिती काही कालावधीनंतर सुधारल्याने राज्य शासनाने टप्प्याटप्प्याने शाळा सुरु करण्यास परवानगी दिली. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने प्रथमत: दि.१० नोव्हेंबर, २०२० च्या शासन परिपत्रकान्वये इ.९ वी ते १२ वी चे वर्ग काही अटी - शर्ती निश्चित करुन दि.२३ नोव्हेंबर, २०२० पासून सुरु करण्यास मान्यता दिली. त्यानंतर दि.१८ जानेवारी, २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये इ. ५ वी ते ८ वी चे वर्ग दि.२७ जानेवारी, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता दिली. तथापि, त्यानंतर राज्यात कोरोनाची दुसरी लाट टप्प्याटप्प्याने वाढत गेली. त्यामुळे राज्य शासनाने दि. १५ एप्रिल, २०२१ पासून राज्यात पुन्हा लॉकडाऊन जाहीर केले. त्यानंतर राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे राज्यातील लॉकडाऊन उठविण्यात आले. त्यामध्ये राज्य शासकीय कार्यालयातील उपस्थिती टप्प्याटप्प्याने वाढविण्यात आली आहे. तसेच इतर आस्थापना देखिल सुरु करण्यास टप्प्याटप्प्याने मान्यता देण्यात आली आहे.

२. मागील वर्षी शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने त्यांच्या दि.१४ जून, २०२१ च्या पत्रान्वये विदर्भ वगळता राज्यातील इतर भागात दि.१५ जून, २०२१ पासून व विदर्भात दि.२८ जून, २०२१ पासून शैक्षणिक वर्ष सुरु करणेबाबत जाहिर केले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत ऑनलाईन शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा उल्लेखदेखील सदर पत्रात करण्यात आला आहे. तसेच सदर पत्रान्वये वरील दिनांकापासून शिक्षकांच्या

उपस्थितीबाबत निर्देश देण्यात आले आहे. संदर्भाधीन दि.७जुलै, २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यातील कोविड मुक्त ग्रामीण भागातील पहिल्या टप्प्यात इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग सुरक्षितपणे सुरु करण्यात आले आहेत. परंतु विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षितता प्राथमिकता असून शालेय शिक्षण विभाग online शिक्षणासाठी सातत्याने आग्रही आहे. मागील वर्षभरात विविध माध्यमातून प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.परंतु ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही की, आर्थिक, सामाजिक,तांत्रिक (टॅब,स्मार्ट फोन इ.चा अभाव) विषमता पहाता शेवटच्या घटकातील विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी संमिश्र (offline-online) शिक्षणाची गरज आहे.त्यासाठी ऑनलाईन शिक्षणाबरोबरच ऑफलाईन शिक्षण सुरू करणे आवश्यक आहे.

३. जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफने प्रत्यक्ष शिक्षणापासून प्रदिर्घ काळ शाळेपासून दुर राहिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्षमतेवर दूरगामी परिणाम होऊ शकतात. शाळा बंद असल्यामुळे मुले एक वर्षापासून घरी बसली आहेत व त्यामुळे त्यांच्यावर शारिरीक, मानसिक (psychological) तणाव येऊन दुष्परिणाम होत आहेत. या बाबीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. पुढे जस-जसा कालावधी जाईल, तस-तसे सदर नुकसान भरून काढणे कठीण जाईल. काही शाळा मध्ये विद्युत पुरवठा व इंटरनेट सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले. गतवर्षी बऱ्याच कालावधी टाळेबंदी पाळली गेल्यामुळे अध्यापन व अध्ययन प्रक्रियेमध्ये खंड पडला. बाल-विवाह, बालमजुरीचे वाढते प्रमाण, मुलींचे/मुलांचे गळतीचे प्रमाण (drop-out) व घर-शेती कामात ठेवणे इ. मोठया प्रमाणावर सामाजिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

४. भारतीय वैद्यकिय संशोधन परिषदेकडून नुकताच चौथा सेरो सर्व्हे करण्यात आला. सदर चौथ्या सेरो सर्वेक्षणात ६ ते १७ वयोगटातील मुलांचाही समावेश करणात आल्याने सदर निष्कर्ष महत्वाचे आहेत. देशातील सहा ते नऊ वयोगटातील ५७.२ टक्के मुलांमध्ये प्रतिपिंडे (Antibodies) विकसित झाल्याचे सदर सर्वेक्षणामध्ये दिसून आले आहे. त्यानुषंगाने देशात सुरूवातीला शाळा सुरू करणेपूर्वी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे लसीकरण झालेले असणे आवश्यक आहे असे भारतीय वैद्यकिय संशोधन परिषदेचे महासंचालक यांनी मत नोंदविले आहे.

५. शाळा सुरू करण्याबाबत दि.९ ते १२ जुलै,२०२१ या कालावधीत राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून जिल्हानिहाय सर्वेक्षण करण्यात आले. कोविडशी संबंधित आवश्यक त्या सर्व सुरक्षाविषयक उपाययोजना करून प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यास आपल्या पाल्यास शाळेत पाठविण्याची आपली तयारी असल्याचे ८१.१८ टक्के पालकानी सदर सर्वेक्षणामध्ये सांगितले. तसेच राज्यातील प्राथमिक शाळा सुरू करण्याबाबत प्राथमिक शिक्षक संघटनांकडूनही मागणी करण्यात येत आहे.

६. वरील सर्व बाबींचा विचार करता, कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झालेला असल्यामूळे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे Break the Chain-Modified Guidelines आदेश दि.२ ऑगस्ट,२०२१ नुसार काही जिल्ह्यांमध्ये कोविड काळातीलनिर्बंधांसंबंधी निर्णयाबाबत संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना व इतर जिल्ह्यांमध्ये शाळांसंबंधी निर्णयाबाबत शालेय शिक्षण विभागास अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणाचा लाभ व्हावा यासाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये शाळांचे वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यापूर्वी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.७ जुलै,२०२१ च्या शासन परिपत्रकानुसार कोविडमुक्त ग्रामीण भागातील इयत्ता ८ ते १२ वी चे वर्ग

सुरू करण्यात आले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपरोक्त नमूद Break the Chain-Modified Guidelines विचारात घेता कोविडचा प्रादुर्भाव कमी झालेल्या शहरी भागातील इयत्ता ८ ते १२ वी चे वर्ग व ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरू करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक :**

**७.** त्यानुषंगाने दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ पासून राज्यातील ग्रामीण भागात इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग व शहरी भागातील इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.मुंबई,मुंबई उपनगर,ठाणे शहरातील कोविड परिस्थिती विचारात घेवून शाळा सुरू करणेबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच दिनांक २ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या ब्रेक द चेन मधील सुधारीत मार्गदर्शक सूचनानूसार कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, अहमदनगर, बीड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर जिल्ह्यातील कोविड परिस्थिती विचारात घेवून व अन्य जिल्ह्यांबाबत देखील शाळा सुरु करणेबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**महानगरपालीका क्षेत्रातील शाळा सुरू करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करावी.**

| | |
|---|---|
| १.आयुक्त, महानगरपालीका | अध्यक्ष |
| २.वार्ड ऑफीसर | सदस्य |
| ३. वैद्यकीय अधिकारी ,महानगरपालिका | सदस्य |
| ४. शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक | सदस्य |

**नगरपंचायत/नगरपालिका/ग्रामपंचायत स्तरावर यांच्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करावी.**

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मुख्याधिकारी, नगरपरिषद | सदस्य |
| ३. वैद्यकीय अधिकारी ,नगरपरिषद/ जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) | सदस्य |

**<u>७.१) समितीने शाळा सुरू करण्यापूर्वी खालील बाबीवर चर्चा करावी.</u>**

(i) शाळा सुरु करण्यापूर्वी कमीत कमी १ महिना संबंधित शहरात / गावात कोविडचा प्रादुर्भाव कमी झालेला असावा.

(ii) शिक्षकांचे लसीकरण करणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजन करावे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/ आयुक्त,महानगरपालिका/मुख्याधिकारी, नगरपरिषद व शिक्षणाधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा.

(iii) विद्यार्थ्यांच्या पालकांना गर्दी टाळण्यासाठी शाळेच्या परिसरात प्रवेश देऊ नये.

(iv) कोविड संबंधी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. उदा.जास्त विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये दोन सत्रांमध्ये, एका बाकावर एकच विद्यार्थी, दोन बाकांमध्ये ६ फूट अंतर, एका

वर्गात जास्तीत जास्त १५-२० विद्यार्थी, सतत हात साबणाने धुणे, मास्कचा वापर, कोणतेही लक्षण असल्यास विद्यार्थ्यांना घरी पाठविणे व लगेच कोरोना चाचणी करून घेणे, इ.

(v) विद्यार्थी कोविडग्रस्त झाल्याचे आढळल्यास तात्काळ शाळा बंद करुन शाळा निर्जंतुकीकरण करण्याची कार्यवाही मुख्याध्यापकांनी करुन घ्यावी व विद्यार्थ्यांचे विलगीकरण करावे व वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्लाने वैद्यकीय उपचार सुरु करावेत.

७.२) शाळा सुरू करताना मुलांना टप्प्या-टप्प्यात शाळेत बोलविण्यात यावे.उदा.वर्गांना अदला-बदलीच्या दिवशी/ सकाळी-दुपारी, ठराविक महत्वाच्या (core) विषयांसाठी प्राधान्य इ. हयासाठी सोबत जोडलेल्या मार्गदर्शन सूचना ( SOP) चे पालन करावे.

७.३) संबंधीत शाळेतील शिक्षकांनी राहण्याची व्यवस्था शक्यतो त्याच शहरात / गावात करावी, किंवा त्यांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा शक्यतो वापर न करण्याबाबत दक्षता घ्यावी.

७.४) वरील सर्व बाबींचे शहरी भागात महानगरपालीका आयुक्त व इतर भागात जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/ मुख्याधिकारी,नगरपरिषद यांनी शिक्षणाधिकारी, आरोग्य अधिकारी यांच्या समवेत सातत्याने आढावा घेऊन आवश्यक तेथे संबंधितांना सूचना कराव्यात. शाळा सुरु करण्यापूर्वी व शाळा सुरु झाल्यानंतर आरोग्य, स्वच्छता व इतर सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबतच्या मार्गदर्शक सूचना ( SOP )सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब** मध्ये देण्यात येत आहेत.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०८१०१५१४०११७२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( राजेंद्र पवार )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४) मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
५) मा. सभापती व मा. उपसभापती, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
६) मा. मंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
८) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

११) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) प्रभारी संचालक, बालभारती,
१४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१६) मुख्याधिकारी, नगरपालिका, सर्व
१७)शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक (सर्व)
१८) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).
१९) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
२०) निवडनस्ती (कार्या.एसडी-६).

## परिशिष्ट-अ

## शाळा सुरु करण्यापूर्वी आरोग्य, स्वच्छत्ता व इतर सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबतच्या मार्गदर्शक सूचना

### १. शाळेत स्वच्छता व निर्जंतुकीकरण विषयक सुविधा सुनिश्चित करणे:-

- मुलांना सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात शिक्षण देण्यासाठी प्रत्येक शाळेने विद्यार्थी/शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आजारी पडल्यास त्यांचे अलगीकरण व त्यांच्यावर काय उपचार करावेत ? शाळा तात्पुरती बंद करावी लागल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु राहण्यासाठी करावयाच्या उपाय योजना याचा कृती आराखडा तयार करावा.
- शाळा सुरु करण्यापूर्वी शाळेमध्ये मुलांनी यावे यासाठी शाळा व्यवस्थापन समितीने " **चला मुलांनो शाळेत चला** " (Back to School) अशी मोहिम राबवावी.
- शाळेत हात धुण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे.
- तापमापक (Thermometer), जंतूनाशक, साबण-पाणी इत्यादी आवश्यक वस्तुंची उपलब्धता तसेच शाळेची स्वच्छता व निर्जंतुकीकरण स्थानिक प्रशासनाने (ग्रामीण व शहरी) सुनिश्चित करावे. वापरण्यात येणारे तापमापक हे calibrated contactless infrared digital thermometer असावे.
- ज्या ठिकाणी वाहतूक सुविधेचा वापर करण्यात येणार आहे अशा शाळांनी मुख्याध्यापकांच्या नियंत्रणाखाली वाहतुक आराखडा तयार करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकरीता वाहतुक सुविधांचे वेळो वेळी निर्जंतुकीकरण करावे.
- एखाद्या शाळेत विलगीकरण केंद्र (क्वारंटाईन सेंटर) / कोविड सेंटर असल्यास स्थानिक प्रशासनाने ते इतर ठिकाणी स्थलांतर करावे. स्थानिक प्रशासनाने अशा शाळेचे हस्तांतरण शाळा व्यवस्थापनाकडे करण्यापूर्वी त्याचे पूर्णत: निर्जंतुकीकरण करुन हस्तांतर शाळेकडे करावे.

### २. शिक्षकांची कोविड-१९ बाबतची चाचणी:-

- संबंधित शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कोविड-१९ साठीची ४८ तासापूर्वीची RTPCR चाचणी करावी. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदर चाचणीचे प्रयोगशाळेने दिलेले प्रमाणपत्र शाळा व्यवस्थापनास सादर करावे. सदर प्रमाणपत्राची शाळा व्यवस्थापनाने पडताळणी करावी
- ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे चाचणी अहवाल positive असतील त्यांनी कोविड मुक्त झाल्यानंतरच शाळेत उपस्थित राहवे. शाळेच्या प्रमुखांनी आजारी असल्याच्या कारणामुळे कर्मचाऱ्यास रजेवर राहण्याची परवानगी देण्यात यावी.
- ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे चाचणी अहवाल negative आहेत त्यांनी शाळेत उपस्थित राहताना कोविड-१९ संदर्भातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच कोविड-१९ बाबतची लक्षणे आढळल्यास त्यांनी त्वरीत चाचणी करावी.

**३. बैठक व्यवस्था :-**

- वर्गखोली तसेच स्टाफ रुम मधील बैठक व्यवस्था शारीरिक अंतर (Physical Distancing) च्या नियमांनुसार असावी.
- वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे बैठक व्यवस्था असावी.

**४. शारीरिक अंतर (Physical distancing) च्या नियमांच्या अंमलबजावणीकरिता विविध चिन्हे व खुणा प्रदर्शित करणे :-**

- शाळेत दर्शनी भागावर Physical distancing, मास्कचा वापर इत्यादी संदर्भात मार्गदर्शक सूचना प्रदर्शित कराव्यात.
- थूंकण्यावरील बंदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
- शाळेच्या अंतर्गत व बाह्य परिसरामध्ये रांगेत उभे राहण्याकरिता किमान सहा फूट इतके शारीरिक अंतर (Physical distance) राखले जाईल याकरिता विशिष्ट चिन्हे जसे चौकोन, वर्तुळ इत्यादींचा वापर गर्दी होणारी ठिकाणे, जसे पाणी पिण्याच्या सुविधा, हात धुण्याच्या सुविधा, स्वच्छतागृहे इत्यादीच्या ठिकाणी करण्यात यावा.
- शारीरिक अंतर (Physical distance) राखण्यासाठी जेथे शक्य असेल तेथे येण्या व जाण्याचे वेगवेगळे मार्ग निश्चित करणाऱ्या बाणांच्या खुणा दर्शविण्यात याव्यात

**५. शाळेतील कार्यक्रम आयोजनावरील निर्बंध** :-

- परिपाठ, स्नेह संम्मेलन, व इतर तत्सम कार्यक्रम ज्यामुळे अधिक गर्दी होऊ शकते अथवा स्पर्श होईल अशा कार्यक्रमांच्या आयोजनावर कडक निर्बंध असेल. शिक्षक- पालक बैठका ऑनलाईन घ्याव्यात.

**६. पालकांची संमती व पालकांनी घ्यावयाची दक्षता :-**

- विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी त्यांच्या पालकांची संमती आवश्यक असेल. शाळा व्यवस्थापन समितीने पालकांशी वरील विषयी चर्चा करावी.
- आजारी असलेल्या किंवा लक्षण असलेल्या मुलांना पालकांनी शाळेत पाठवू नये.

**७. विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाजातील सदस्य यांना कोविड-१९ च्या संदर्भातील आव्हाने व त्याबाबतची त्यांची भूमिका याबाबत जागरुक करणे:-**

- शाळा सुरु करण्यापूर्वीच विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाजातील सदस्य यांच्यात जागरुकता निर्माण करण्याकरिता शाळा व्यवस्थापन समितीने पत्रके, पत्रे व सार्वजनिक घोषणांच्या माध्यमांचा वापर करुन पुढील मुद्द्यांबाबत कार्यवाही करावी:-

a) वैयक्तिक स्वच्छता व नेहमी वापरण्यात येणारे पृष्ठभागांचे निर्जंतुकीकरण इत्यादीबाबत काय करावे किंवा काय करु नये याबाबतच्या सुचना.

b) शारीरिक अंतर पालनाचे (Physical distancing) चे महत्व.

c) कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी आवश्यक स्वच्छताविषयक सवयी.

d) कोविड-१९ बाबतच्या गैरसमजुती.

e) कोविड-१९ ची लक्षणे आढळल्यास शाळेत जाणे टाळणे.

f) मास्कचा वापर करावा

g) हात सातत्याने साबणाने स्वच्छ करावेत.

• केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या सुचनांनुसार, सर्वच कर्मचारी जे (कोविड-१९च्या अनुषंगाने) अधिक उच्च धोक्याच्या पातळीमध्ये आहेत, जसे वयोवृद्ध कर्मचारी, दिव्यांग कर्मचारी, गरोदर महिला कर्मचारी व जे कर्मचारी औषध-उपचार घेत आहेत, त्यांनी अधिक काळजी घ्यावी. त्यांनी शक्यतो विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊ नये.

**८) शाळेतील उपस्थितीबाबतच्या धोरणांमध्ये सुधारणा करणे:-**

• विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती बंधनकारक नसून पूर्णत: पालकांच्या संमती वर अवलंबून असेल.

• १००% उपस्थितीबाबत देण्यात येणारी पारितोषिके कोविड-१९ परिस्थितीमुळे सद्य परिस्थितीत देऊ नये. भविष्यामध्ये कोविड परिस्थिती सुधारल्यानंतर नियमित शाळा सुरु झाल्यानंतर अशी पारितोषिके देता येतील.

**९) शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांचे लसीकरण करणे आवश्यक-**

• शाळा सुरु करण्यापूर्वी त्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे लसीकरण झालेले असणे आवश्यक आहे

**शाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांना नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त आणिबाणीच्या प्रसंगी इतर कर्मचाऱ्यांची कामे करण्यासाठी प्रशिक्षित करावे.**

---------------

## परिशिष्ट-ब

## शाळा सुरू झाल्यानंतर आरोग्य, स्वच्छता व इतर सुरक्षाविषयक उपायोजनाबाबतच्या मार्गदर्शक सूचनाः-

### १. शाळेत व शाळेच्या परिसरात स्वच्छता व आरोग्यदायी परीस्थिती सतत राखणे:-

- शाळेचा परीसर दररोज नियमितपणे स्वच्छ केला जावा.
- शाळेतील वर्गखोल्या व वर्गखोल्यांच्या बाहेरील नेहमी स्पर्श होणारा पृष्ठभाग जसे स्वचछतागृहे, हॅण्डल, अध्ययन-अध्यापन साहित्य, डेस्क, टॅबलेट्स, खुर्च्या,वाहने इ.वारंवार स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- शाळेतील व शाळेच्या परीसरातील सर्व कचऱ्याची नियमितपणे विल्हेवाट लावण्यात यावी.
- हात धुण्याच्या सर्व ठिकाणी साबण, हॅन्डवॉश व स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. शक्य झाल्यास सॅनिटायझर सर्व महत्त्वाच्या ठिकाणी ठेवण्यात यावा.
- सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात यावी.
- विद्यार्थ्यांनी सोबत वॉटर बॅाटल आणण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करावे.
- शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा सुटल्यानंतर शाळा व वर्ग खोल्यांचे नियमितपणे निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- वरील सर्व स्वच्छतेमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊ नये

### २. शाळेत विद्यार्थ्यांना सुरक्षित ठेवणे :-

- जास्त विद्यार्थी असलेल्या शाळा दरदिवशी दोन सत्रांमध्ये भरविण्यात याव्यात.
- सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी शाळेत येताना व शाळेत असेपर्यंत तसेच, शाळेत कोणतीही कृती करताना मास्कचा वापर करावा. तसेच, विद्यार्थी मास्कची अदलाबदल करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्गाची दररोज Thermal Screening चाचणी घेण्यात यावी.
- विद्यार्थी, शिक्षक व शाळेतील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तिला शाळेच्या परिसरात व शाळेच्या प्रवेशद्वारावर प्रवेश देऊ नये.
- काही विद्यार्थी सूचनांचे पालन करत नसल्यास ते त्यांच्या पालकांच्या निदर्शनांस आणावे.

### ३. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाची सोय करणे :-

- कोविड-१९ संसर्ग टाळण्यासाठी पालकांनी शक्यतो विद्यार्थ्यांना स्वत: त्यांच्या वैयक्तिक वाहनाने शाळेत सोडावे.
- वाहन चालक व वाहक यांनी स्वत: तसेच विद्यार्थी शारीरिक अंतराचे पालन करतील याची दक्षता घ्यावी.
- बस / कार यांच्या खिडक्या उघडया ठेवण्यात याव्यात.

- वातानुकूलित बसेस मध्ये २४ ते ३० डिग्री सेल्सिअस तापमान राखावे.
- शक्य असल्यास वाहनात हॅन्ड सॅनिटायझर ठेवण्यात यावे

**४.कर्मचारी व विद्यार्थी यांचा सुरक्षीत प्रवेश व गमन (Entry and Exit) :-**

- विद्यार्थी व कर्मचारी वर्गांचे आगमन व गमन (Entry and Exit) यांचे वेळापत्रक अशा प्रकारे निश्चित करावे, ज्यामुळे शाळेत होणारी गर्दी टाळली जाईल.
- दर दिवशीच्या दोन सत्रांच्या मध्ये योग्य तो कालावधी देण्यात यावा ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये योग्य ते शारिरिक अंतर राखणे शक्य होईल.
- शाळेस एकापेक्षा अधिक प्रवेशद्वार असल्यास शाळेत येताना व जातांना सर्व प्रवेशद्वारांचा वापर करावा.
- कुटुंबातील एखादा सदस्य ताप / खोकला यांनी आजारी असल्यास आपल्या मुलांना पालकांनी शाळेत पाठवू नये.

**५. वर्गखोल्या व इतर ठिकाणी सुरक्षिततेच्या मानकांची खात्री करावी :-**

- शाळेत प्रात्यक्षिक (Practicals) घेताना विद्यार्थ्यांचे लहान लहान गट करुन घेण्यात यावेत म्हणजे शारीरिक अंतराचे (Physical Distancing) पालन करणे सुलभ होईल.
- विद्यार्थ्यांनी कोणतेही साहित्य जसे पुस्तके, वही, पेन, पेन्सिल, वॉटर बॉटल, शाळेत येताना सोबत आणावे व त्यांची अदलाबदल करू नये.
- शक्य असल्यास वर्ग खुल्या परिसरात घ्यावेत. शक्य नसल्यास वर्गखोल्यांची दारे व खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात.
- उदवाहन (lift) व व्हरांड्यांतील उपस्थित व्यक्तीच्या संख्येवर निर्बध आणावेत.
- स्वच्छतागृहामध्ये अधिक गर्दी होऊ नये, याची दक्षता घ्यावी.
- विद्यार्थ्यांनी प्रत्येक कृती केल्यानंतर हात स्वच्छ धुवावेत.
- वातानुकुलित वर्ग खोल्यां असल्यास तापमान २४ ते ३० डिग्री सेंटिग्रेड ठेवावे.

**६. अभ्यासवर्गांची व्यवस्था:-**

- जास्त विद्यार्थी असलेल्या शाळा दरदिवशी दोन सत्रांमध्ये भरविण्यात याव्यात
- प्रत्यक्ष वर्गांचा कालावधी ३ ते ४ तासांपेक्षा अधिक असू नये. प्रत्यक्ष वर्गांकरिता जेवणाची सुट्टी नसेल.

**७. कोविड-१९ संशयित आढळल्यास करावयाची कार्यवाही :-**

- शिक्षक, कर्मचारी वर्ग किंवा विद्यार्थी संशयित आढळल्यास त्यास एका खोलीत इतरांपासून वेगळे ठेवावे तसेच त्यांना तात्काळ वैद्यकीय उपचार मिळतील याची दक्षता घ्यावी. व आरोग्य नियमाचे काटेकोर पालन करावे.

- कोविड-१९ ची लक्षणे आढळल्यास त्यास तात्काळ नजीकच्या रुग्णालयात दाखल करावे किंवा जिल्हा व राज्य संपर्क क्रमांकास (Helpline) कळवावे. राज्य व जिल्हा helpline क्रमांक तसेच जवळील कोविड सेंटर बद्दलची माहिती मुख्याध्यापक व प्रत्येक शिक्षकांच्या मोबाईलमध्ये असावी.

**८. मानसिक व सामाजिक कल्याण :-**

- चिंता आणि निराशा यासारख्या मानसिक आरोग्याच्या समस्या नोंदविणाऱ्या किंवा सांगणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी नियमित समुपदेशन केले जाईल, याचे नियोजन करावे.

**उपरोक्त सूचनांव्यतिरिक्त स्थानिक परिस्थितीनुसार शाळांनी आवश्यक मार्गदर्शक तत्वे सुचना निश्चित करावीत व प्रभावी अंमलबजावणी करावी.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्यातील कोविड मुक्त ग्रामीण भागातील पहील्या टप्प्यात इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग सुरक्षितपणे सुरु करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण : २०२१/प्र.क्र.९४/एसडी-६
मादम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ७ जुलै, २०२१

वाचा :- १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १५ जून, २०२०.
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २४ जून, २०२०.
३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २२ जुलै, २०२०.
४) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १७ ऑगस्ट, २०२०.
५) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २९ ऑक्टोबर, २०२०.
६) संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.जाक्र अमाशा /शा.सुरु/२०२१/एस-१/१८७२, दि.१४ जून, २०२१.
७) मा.मुख्यमंत्री यांचेकडील बैठक दिनांक २२/०६/२०२१

पार्श्वभूमी :-

सन २०२० या वर्षात राज्यामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु झाला. त्यानंतर शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे राज्यातील कोरोनाची परिस्थिती काही कालावधीनंतर सुधारल्याने राज्य शासनाने टप्प्याटप्प्याने शाळा सुरु करण्यास परवानगी दिली. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने प्रथमत: दि.१० नोव्हेंबर, २०२० च्या शासन परिपत्रकान्वये इ.९ वी ते १२ वी चे वर्ग काही अटी - शर्ती निश्चित करुन दि.२३ नोव्हेंबर, २०२० पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानंतर दि.१८ जानेवारी, २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये इ. ५ वी ते ८ वी चे वर्ग दि.२७ जानेवारी, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, त्यानंतर राज्यात कोरोनाची दुसरी लाट टप्प्याटप्प्याने वाढत गेली. त्यामुळे राज्य शासनाने दि. १५ एप्रिल, २०२१ पासून राज्यात पुन्हा लॉकडाऊन जाहीर केले. त्यानंतर राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे राज्यातील लॉकडाऊन उठविण्यात आले. त्यामध्ये राज्य शासकीय कार्यालयातील उपस्थिती टप्प्याटप्प्याने वाढविण्यात आली आहे. तसेच इतर आस्थापना देखिल सुरु करण्यास टप्प्याटप्प्याने मान्यता देण्यात आली आहे.

मागील वर्षी शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने त्यांच्या दि.१४ जून, २०२१ च्या पत्रान्वये विदर्भ वगळता राज्यातील इतर भागात दि.१५ जून, २०२१ पासून व विदर्भात दि.२८ जून, २०२१ पासून शैक्षणिक वर्ष सुरु करणेबाबत जाहिर केले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत ऑनलाईन शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा उल्लेखदेखिल सदर पत्रात करण्यात आला आहे. तसेच सदर पत्रान्वये वरील दिनांकापासून शिक्षकांच्या उपस्थितीबाबत निर्देश देण्यात आले आहे. मागील वर्षभरात विविध माध्यमातून प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण शाळा बंद असल्यामुळे मुले एक वर्षापासून घरी बसली आहेत व त्यामुळे त्यांच्यावर शारिरीक, मानसिक (psychological) तणाव येऊन दुष्परिणाम होत आहेत, या बाबीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. पुढे जस-जसा कालावधी जाईल, तस-तसे सदर नुकसान भरून काढणे कठीण जाईल. काही शाळा मध्ये विद्युत पुरवठा व इंटरनेट सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले. गतवर्षी बऱ्याच कालावधी टाळेबंदी पाळली गेल्यामुळे अध्यापन व अध्ययन प्रक्रियेमध्ये खंड पडला. त्यामुळे बाल-विवाह, बालमजुरीचे वाढते प्रमाण, मुलींचे/मुलांचे गळतीचे प्रमाण (drop-out) व घर-शेती कामात ठेवणे इ. मोठया प्रमाणावर सामाजिक नुकसान होण्याची शक्यता आहे. इयत्ता १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थी करिता इयत्ता ९ वी व ११ वी हा पाया असतो, त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणाचा लाभ व्हावा यासाठी कोविड-मुक्त क्षेत्रात शाळा सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक :**

या शासन परिपत्रकानुसार दिनांक १५ जुलै २०२१ पासून राज्यातील कोविड-मुक्त क्षेत्रात शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. ग्रामपंचायतीनी ठराव करुन खालील निकषांच्या आधारे पहिल्या टप्प्यात शाळेतील इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) ग्रामीण भागात कोविड-मुक्त गावातील ग्रामपंचायतीने त्यांच्या अखत्यारीत असणारे गावातील शाळेतील इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग सुरू करणेबाबत पालकांशी चर्चा करून ठराव करावा.

**ग्रामपंचायत स्तरावर संरपंच यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठीत करावी.**

| | |
|---|---|
| १.सरपंच, | अध्यक्ष |
| २. तलाठी | सदस्य |
| ३. अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती | सदस्य |
| ४. वैद्यकीय अधिकारी , प्राथमिक आरोग्य केंद्र | निमंत्रीत सदस्य |
| ५. ग्रामसेवक | सदस्य सचिव |
| ६. मुख्याध्यापक | सदस्य |
| ७.केंद्रप्रमुख | सदस्य |

**समितीने शाळा सुरू करण्यापूर्वी खालील बाबीवर चर्चा करावी.**

(i) शाळा सुरु करण्यापूर्वी कमीत कमी १ महिना संबंधित गावात कोविड रुग्ण आढळून आला नसावा.

(ii) शिक्षकांचे लसीकरण प्राधान्याने करणे बाबत जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजन करावे.याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व शिक्षण अधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा.

(iii) विद्यार्थ्यांच्या पालकांना गर्दी टाळण्यासाठी शाळेच्या परिसरात प्रवेश देऊ नये.

(iv) विद्यार्थी कोविडग्रस्त झाल्याचे आढळल्यास तात्काळ शाळा बंद करुन शाळा निर्जंतुकीकरण करण्याची कार्यवाही मुख्याध्यापकांनी करुन घ्यावी व विद्यार्थीचे विलगीकरण करावे व वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्लाने वैद्यकीय उपचार सुरु करावेत.

२) शाळा सुरू करताना मुलांना टप्प्या-टप्प्यात शाळेत बोलविण्यात यावे.उदा.वर्गांना अदला-बदलीच्या दिवशी/ सकाळी-दुपारी, ठराविक महत्वाच्या (core) विषयांसाठी प्राधान्य इ. हयासाठी सोबत जोडलेल्या मार्गदर्शन सूचना ( SOP) चे पालन करावे.

कोविड संबंधी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. उदा.एका बाकावर एकच विद्यार्थी, दोन बाकांमध्ये ६ फूट अंतर, एका वर्गात जास्तीत जास्त १५-२० विद्यार्थी, सतत हात साबणाने धुणे, मास्कचा वापर, कोणतेही लक्षण असल्यास विद्यार्थ्यांना घरी पाठविणे व लगेच कोरोना चाचणी करून घेणे, इ.

३) संबंधीत शाळेतील शिक्षकांची राहण्याची व्यवस्था शक्यतो त्याच गावात करावी, किंवा त्यांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर न करण्याबाबत दक्षता घ्यावी.

१. वरील सर्व बाबींचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शिक्षणाधिकारी, आरोग्य अधिकारी यांच्या समवेत सातत्याने आढावा घेऊन आवश्यक तेथे सूचना कराव्यात. शाळा सुरु करण्यापूर्वी व शाळा सुरु झाल्यानंतर आरोग्य, स्वच्छता व इतर सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबतच्या मार्गदर्शक सूचना ( SOP )सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये देण्यात येत आहेत.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०७०७१४४०१९३८२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( राजेंद्र पवार )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४) मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
५) मा. सभापती व मा. उपसभापती, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
६) मा. मंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
८) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
११) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) प्रभारी संचालक, बालभारती,
१४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१६) शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक (सर्व)
१७) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).
१८) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
१९) निवडनस्ती (कार्या.एसडी-६)

## परिशिष्ट-अ

## शाळा सुरु करण्यापूर्वी आरोग्य, स्वच्छत्ता व इतर सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबतच्या मार्गदर्शक सूचना

### १. शाळेत स्वच्छता व निर्जंतुकीकरण विषयक सुविधा सुनिश्चित करणे:-

- मुलांना सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात शिक्षण देण्यासाठी प्रत्येक शाळेने विद्यार्थी/शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आजारी पडल्यास त्यांचे अलगीकरण व त्यांच्यावर काय उपचार करावेत ? शाळा तात्पुरती बंद करावी लागल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु राहण्यासाठी करावयाच्या उपाय योजना याचा कृती आराखडा तयार करावा.
- शाळा सुरु करण्यापूर्वी शाळे मध्ये मुलांनी यावे या साठी शाळा व्यवस्थापन समितीने " **चला मुलांनो शाळेत चला** " (Back to School) अशी मोहिम राबवावी.
- शाळेत हात धुण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे.
- तापमापक (Thermometer), जंतूनाशक, साबण-पाणी इत्यादी आवश्यक वस्तुंची उपलब्धता तसेच शाळेची स्वच्छता व निर्जंतुकीकरण स्थानिक प्रशासनाने (ग्रामीण व शहरी) सुनिश्चित करावे. वापरण्यात येणारे तापमापक हे calibrated contactless infrared digital thermometer असावे.
- ज्या ठिकाणी वाहतूक सुविधेचा वापर करण्यात येणार आहे अशा शाळांनी वाहतुक सुविधांचे वेळो वेळी निर्जंतुकीकरण करावे.
- एखाद्या शाळेत विलगीकरण केंद्र (क्वारंटाईन सेंटर) असल्यास स्थानिक प्रशासनाने ते इतर ठिकाणी स्थलांतर करावे. स्थानिक प्रशासनाने अशा शाळेचे हस्तांतरण शाळा व्यवस्थापनाकडे करण्यापूर्वी त्याचे पूर्णत: निर्जंतुकीकरण करुन हस्तांतर शाळेकडे करावे.
- विलगीकरण केंद्र (क्वारंटाईन सेंटर) इतर ठिकाणी नेणे शक्य नसल्यास शाळा खुल्या परिसरात किंवा इतर ठिकाणी भरवावी.

### २. शिक्षकांची कोविड-१९ बाबतची चाचणी:-

- संबंधित शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कोविड-१९ साठीची RTPCR चाचणी करावी. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदर चाचणीचे प्रयोगशाळेने दिलेले प्रमाणपत्र शाळा व्यवस्थापनास सादर करावे. सदर प्रमाणपत्राची शाळा व्यवस्थापनाने पडताळणी करावी
- ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे चाचणी अहवाल positive असतील त्यांनी कोविड मुक्त झाल्यानंतरच शाळेत उपस्थित राहवे. शाळेच्या प्रमुखांनी आजारी असल्याच्या कारणामुळे कर्मचाऱ्यास रजेवर राहण्याची परवानगी देण्यात यावी.
- ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे चाचणी अहवाल negative आहेत त्यांनी शाळेत उपस्थित राहताना कोविड-१९ संदर्भातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच कोविड-१९ बाबतची लक्षणे आढळल्यास त्यांनी त्वरीत चाचणी करावी.

**३. बैठक व्यवस्था :-**

- वर्गखोली तसेच स्टाफ रुम मधील बैठक व्यवस्था शारीरिक अंतर (Physical Distancing) च्या नियमांनुसार असावी.
- वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे बैठक व्यवस्था असावी.

**४. शारीरिक अंतर (Physical distancing) च्या नियमांच्या अंमलबजावणीकरिता विविध चिन्हे व खुणा प्रदर्शित करणे :-**

- शाळेत दर्शनी भागावर Physical distancing, मास्कचा वापर इत्यादी संदर्भात मार्गदर्शक सूचना प्रदर्शित कराव्यात.
- थूंकण्यावरील बंदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
- शाळेच्या अंतर्गत व बाह्य परिसरामध्ये रांगेत उभे राहण्याकरिता किमान सहा फूट इतके शारीरिक अंतर (Physical distance) राखले जाईल याकरिता विशिष्ट चिन्हे जसे चौकोन, वर्तुळ इत्यादींचा वापर गर्दी होणारी ठिकाणे, जसे पाणी पिण्याच्या सुविधा, हात धुण्याच्या सुविधा, स्वच्छतागृहे इत्यादीच्या ठिकाणी करण्यात यावा.
- शारीरिक अंतर (Physical distance) राखण्यासाठी जेथे शक्य असेल तेथे येण्या व जाण्याचे वेगवेगळे मार्ग निश्चित करणाऱ्या बाणांच्या खुणा दर्शविण्यात याव्यात

**५. शाळेतील कार्यक्रम आयोजनावरील निर्बंध :-**

- परिपाठ, स्नेह संम्मेलन, व इतर तत्सम कार्यक्रम ज्यामुळे अधिक गर्दी होऊ शकते अशा कार्यक्रमांच्या आयोजनावर कडक निर्बंध असेल. शिक्षक- पालक बैठका ऑनलाईन घ्याव्यात.

**६. पालकांची संमती व पालकांनी घ्यावयाची दक्षता :-**

- विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी त्यांच्या पालकांची संमती आवश्यक असेल. शाळा व्यवस्थापन समितीने पालकांशी वरील विषयी चर्चा करावी.
- आजारी असलेल्या किंवा लक्षण असलेल्या मुलांना पालकांनी शाळेत पाठवू नये.

**७. विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाजातील सदस्य यांना कोविड-१९ च्या संदर्भातील आव्हाने व त्याबाबतची त्यांची भूमिका याबाबत जागरुक करणे:-**

- शाळा सुरु करण्यापूर्वीच विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाजातील सदस्य यांच्यात जागरुकता निर्माण करण्याकरिता शाळा व्यवस्थापन समितीने पत्रके, पत्रे व सार्वजनिक घोषणांच्या माध्यमांचा वापर करुन पुढील मुद्द्यांबाबत कार्यवाही करावी:-

    i. वैयक्तिक स्वच्छता व नेहमी वापरण्यात येणारे पृष्ठभागांचे निर्जंतुकीकरण इत्यादीबाबत काय करावे किंवा काय करु नये याबाबतच्या सुचना.

    ii. शारीरिक अंतर पालनाचे (Physical distancing) चे महत्व.

    iii. कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी आवश्यक स्वच्छताविषयक सवयी.

iv. कोविड-१९ बाबतच्या गैरसमजुती.

v. कोविड-१९ ची लक्षणे आढळल्यास शाळेत जाणे टाळणे.

vi. मास्कचा वापर करावा

vii. हात सातत्याने साबणाने स्वच्छ करावेत.

- केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या सुचनांनुसार, सर्वच कर्मचारी जे (कोविड-१९च्या अनुषंगाने) अधिक उच्च धोक्याच्या पातळीमध्ये आहेत, जसे वयोवृद्ध कर्मचारी, दिव्यांग कर्मचारी, गरोदर महिला कर्मचारी व जे कर्मचारी औषध-उपचार घेत आहेत, त्यांनी अधिक काळजी घ्यावी. त्यांनी शक्यतो विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊ नये.

**८) शाळेतील उपस्थितीबाबतच्या धोरणांमध्ये सुधारणा करणे:-**

- विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती बंधनकारक नसून पूर्णत: पालकांच्या संमती वर अवलंबून असेल.
- १००% उपस्थितीबाबत देण्यात येणारी पारितोषिके कोविड-१९ परिस्थितीमुळे सद्य परिस्थितीत देऊ नये. भविष्यामध्ये कोविड परिस्थिती सुधारल्यानंतर नियमित शाळा सुरु झाल्यानंतर अशी पारितोषिके देता येतील.

**शाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांना नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त आणिबाणीच्या प्रसंगी इतर कर्मचाऱ्यांची कामे करण्यासाठी प्रशिक्षित करावे.**

---------------

## परिशिष्ट-ब

## शाळा सुरू झाल्यानंतर आरोग्य, स्वच्छता व इतर सुरक्षाविषयक उपायोजनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना:-

### १. शाळेत व शाळेच्या परिसरात स्वच्छता व आरोग्यदायी परीस्थिती सतत राखणे:-

- शाळेचा परीसर दररोज नियमितपणे स्वच्छ केला जावा.
- शाळेतील वर्गखोल्या व वर्गखोल्यांच्या बाहेरील नेहमी स्पर्श होणारा पृष्ठभाग जसे स्वचछतागृहे, हॅण्डल, अध्ययन-अध्यापन साहित्य, डेस्क, टॅबलेट्स, खुर्च्या,वाहने इ.वारंवार स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- शाळेतील व शाळेच्या परीसरातील सर्व कचऱ्याची नियमितपणे विल्हेवाट लावण्यात यावी.
- हात धुण्याच्या सर्व ठिकाणी साबण, हॅन्डवॉश व स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

  शक्य झाल्यास सॅनिटायझर सर्व महत्त्वाच्या ठिकाणी ठेवण्यात यावा.
- सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात यावी.
- विद्यार्थ्यांनी सोबत वॉटर बॅाटल आणण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करावे.
- शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा सुटल्यानंतर शाळा व वर्ग खोल्यांचे नियमितपणे निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- वरील सर्व स्वच्छतेमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊ नये

### २. शाळेत विद्यार्थ्यांना सुरक्षित ठेवणे :-

- जास्त विद्यार्थी असलेल्या शाळा दरदिवशी दोन सत्रांमध्ये भरविण्यात याव्यात.
- सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी शाळेत येताना व शाळेत असेपर्यंत तसेच, शाळेत कोणतीही कृती करताना मास्कचा वापर करावा. तसेच, विद्यार्थी मास्कची अदलाबदल करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्गाची दररोज Thermal Screening चाचणी घेण्यात यावी.
- विद्यार्थी, शिक्षक व शाळेतील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तिला शाळेच्या परिसरात व शाळेच्या प्रवेशद्वारावर प्रवेश देऊ नये.
- काही विद्यार्थी सूचनांचे पालन करत नसल्यास ते त्यांच्या पालकांच्या निदर्शनांस आणावे.

### ३. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाची सोय करणे :-

- कोविड-१९ संसर्ग टाळण्यासाठी पालकांनी शक्यतो विद्यार्थ्यांना स्वत: त्यांच्या वैयक्तिक वाहनाने शाळेत सोडावे.
- वाहन चालक व वाहक यांनी स्वत: तसेच विद्यार्थी शारीरिक अंतराचे पालन करतील याची दक्षता घ्यावी.

- बस / कार यांच्या खिडक्या उघडया ठेवण्यात याव्यात.
- **वातानुकूलित बसेस मध्ये 24 ते 30 डिग्री सेल्सिअस तापमान राखावे.**
- शक्य असल्यास वाहनात हॅन्ड सॅनिटायझर ठेवण्यात यावे

**४.कर्मचारी व विद्यार्थी यांचा सुरक्षीत प्रवेश व गमन (Entry and Exit) :-**

- विद्यार्थी व कर्मचारी वर्गांचे आगमन व गमन (Entry and Exit) यांचे वेळापत्रक अशा प्रकारे निश्चित करावे, ज्यामुळे शाळेत होणारी गर्दी टाळली जाईल.
- दर दिवशीच्या दोन सत्रांच्या मध्ये योग्य तो कालावधी देण्यात यावा ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये योग्य ते शारिरिक अंतर राखणे शक्य होईल.
- शाळेस एकापेक्षा अधिक प्रवेशद्वार असल्यास शाळेत येताना व जातांना सर्व प्रवेशद्वारांचा वापर करावा.
- कुटुंबातील एखादा सदस्य ताप / खोकला यांनी आजारी असल्यास आपल्या मुलांना पालकांनी शाळेत पाठवू नये.

**५. वर्गखोल्या व इतर ठिकाणी सुरक्षिततेच्या मानकांची खात्री करावी :-**

- शाळेत प्रात्यक्षिक (Practical॰s) घेताना विद्यार्थ्यांचे लहान लहान गट करुन घेण्यात यावेत म्हणजे शारीरिक अंतराचे (Physical Distancing) पालन करणे सुलभ होईल.
- विद्यार्थ्यांनी कोणतेही साहित्य जसे पुस्तके, वही, पेन, पेन्सिल, वॉटर बॉटल, शाळेत येताना सोबत आणावे व त्यांची अदलाबदल करू नये.
- शक्य असल्यास वर्ग खुल्या परिसरात घ्यावेत. शक्य नसल्यास वर्गखोल्यांची दारे व खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात.
- उदवाहन (lift) व व्हरांड्यांतील उपस्थित व्यक्तीच्या संख्येवर निर्बध आणावेत.
- **स्वच्छतागृहामध्ये अधिक गर्दी होऊ नये, याची दक्षता घ्यावी.**
- **विद्यार्थ्यांनी प्रत्येक कृती केल्यानंतर हात स्वच्छ धुवावेत.**
- **वातानुकुलित वर्ग खोल्यां असल्यास तापमान 24 ते 30 डिग्री सेंटिग्रेड ठेवावे.**

**६. अभ्यासवर्गांची व्यवस्था:-**

- जास्त विद्यार्थी असलेल्या शाळा दरदिवशी दोन सत्रांमध्ये भरविण्यात याव्यात
- प्रत्यक्ष वर्गांचा कालावधी ३ ते ४ तासांपेक्षा अधिक असू नये. प्रत्यक्ष वर्गांकरिता जेवणाची सुट्टी नसेल.

**७. कोविड-१९ संशयित आढळल्यास करावयाची कार्यवाही :-**

- शिक्षक, कर्मचारी वर्ग किंवा विद्यार्थी संशयित आढळल्यास त्यास एका खोलीत इतरांपासून वेगळे ठेवावे तसेच त्यांना तात्काळ वैद्यकीय उपचार मिळतील याची दक्षता घ्यावी.
- कोविड-१९ ची लक्षणे आढळल्यास त्यास तात्काळ नजीकच्या रुग्णालयात दाखल करावे किंवा

जिल्हा व राज्य संपर्क क्रमांकास (Helpline) कळवावे. राज्य व जिल्हा helpline क्रमांक तसेच जवळील कोविड सेंटर बद्दलची माहिती मुख्याध्यापक व प्रत्येक शिक्षकांच्या मोबाईलमध्ये असावी.

**८. मानसिक व सामाजिक कल्याण :-**

- चिंता आणि निराशा यासारख्या मानसिक आरोग्याच्या समस्या नोंदविणाऱ्या किंवा सांगणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी नियमित समुपदेशन केले जाईल, याचे नियोजन करावे.

**उपरोक्त सूचनांव्यतिरिक्त स्थानिक परिस्थितीनुसार शाळांनी आवश्यक मार्गदर्शक तत्वे सुचना निश्चित करावीत व प्रभावी अंमलबजावणी करावी.**